**आर.सी.सी.क्र.४६/२०२०**
**सरकार वि.रामराव सोनटक्के**
**निशाणी क. १३ पुढे सुरु**

निशानी क्रमांक ३१ वरील आदेशान्वये स.सा.क्र. १ चा उलट तपास श्री.एम.पी.कुलकर्णी यांच्या तर्फे शपथेवर सुरु

**५.** माझे वडिल भोजराम जीवंत आहे. हे खरे आहे की, माझे वडिल भोजराम यांच्या विरुध्द या न्यायालयात काही दावे प्रलंबित आहेत. हे खरे नाही की, त्या दिवाणी दाव्यामध्ये माझे वडिल स्वत: काम पाहतात. हे खरे आहे की, घरातील लहान मोठे काम माझे वडिल पाहतात. हे खरे आहे की, या प्रकरणात पोलीसांनी माझे वडिलांचे बयाण घेतले नाही. माझी जन्म दिनांक .३.०७.१९८५ आहे. हे खरे आहे की, फेरफार क्रमांक ४२ हा माझे जन्माच्या पूर्वी झाला. माझे आजोबा आडेल्या यांना एक भाऊ आहे. हे खरे नाही की, माझे आजोबा आडेल्या व आरोपीचे वडिल भोजाजी हे सख्खे भाऊ होते. माझे पंजोबा बाळ्या यांच्याकडे गट क्रमांक २९ मौजे शरिफाबाद येथे २ हेक्टर ६० आर, गट क्रंमाक ३३ मौजे शरिफाबाद येथे २ हेक्टर ३८ आर होती. साक्षीदार सांगतो की, गट क्रमांक ३३ पैकी आता १ हेक्टर ०७ आर शिल्लक आहे. गट क्रमांक २९ चा सर्व्हे क्रमांक २६ आणि गट क्रमांक ३३ चा सर्व्हे क्रमांक २७ होता. हे खरे नाही की, गट क्रमांक २९ च्या जमीनीचे समसमान वाटप आडेल्या आणि भोजाजी यांच्या दरम्यान झाले होते. हे खरे नाही की, केवळ कुटुंब कर्ता म्हणुन माझे आजोबा आडेल्या यांच्या नावाने नोंद होती. हे खरे नाही की, माझे आजोबा यांनी त्यांच्या भावाच्या हिश्यातील जमीन त्यांच्या नावे न करता वारले. हे खरे नाही की, आजोबाच्या मृत्युनंतर माझे वडिलांनी तलाठ्याकडे खोटा अर्ज करुन जमीन स्वत :च्या नावे करुन घेतली. हे खरे नाही की, जेंव्हा ती चुक तलाठ्याच्या लक्षात आली तेंव्हा फेरफार क्रमाक ४२ अन्वये चुकीची दुरुस्ती केली.

**६.** फेरफार क्रमाक ४२ च्या विरोधात माझे वडिल अथवा आजोबांनी महसुल कार्यालयात अपील केले नव्हते. मला कळाल्यावर मी अपील केले होते. माझे विलंब माफीचा अर्ज नामंजुर झाला. त्या विरुध्द मी जिल्हाधिका—यांकडे गेलो. तेथे देखील माझा अर्ज नामंजुर झाला. त्यानंतर मी आयुक्तालयाकडे अपील केले पण ते ही फेटाळले. फेरफार क्रमांक ४२ चा माझे खात्यातुन जमीन कमी झाली त्याच्याशी काहीही संबंध नाही. हे खरे आहे की, मी फेरफार क्रमाक ४२ बघितला आहे. हे खरे आहे की, त्यात दुरुस्ती तलाठ्याने केलेली आहे. हे खरे आहे की, त्या दुरुस्तीस मंडळ अधिका—यांनी मंजुरी दिली. हे खरे आहे की, आजतागायत फेरफार क्रमांक ४२ अस्तित्वात आहे.

**७.** पंजोबा बाळ्या यांना किती वारस होते त्याचे प्रमाणपत्र दाखल केले नाही. माझे घरात

आत्या व काका नाहीत. आई—वडिल आहेत. हे खरे आहे की, पोलीसांनी माझे आईचे बयाण घेतले नाही. हे खरे नाही की, मला आरोपी विरुध्द फौजदारी कारवाई करण्याचा कोणताही हक्क नाही. हे खरे आहे की, गट क्रमांक २९ ला माझे नाव नाही. परंतु वडिलांचे नाव आहे. हे खरे नाही की, मी पोलीसांना तपासकामी पोलीसांना कोणतेही कागदपत्र दिले नाही. हे खरे नाही की, आरोपीने कधीही कोणती फसवणुक केली नाही. हे खरे नाही की, खोटया नोंदणी घेवून खोटे प्रकरण दाखल केले आणि आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, खोटे अर्ज करुन आरोपींना विनाकारण त्रास देतात. हे खरे नाही की, मी खोटे प्रकरण दाखल केले. हे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**फेर तपास नाही.**

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक ०१.०७.२०२३

स्वाक्षरीत/—

( एस. ए. हरणे )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,धर्माबाद.